# महत्वाचे नियम व अटी

1. हे इट्झकॅश ईवॉलेट खाते (अर्धबंद प्रीपेड साधन 'ईवॉलेट') हे एक आभासी खाते आहे जे वापरकर्त्याला इट्झकॅश अधिदान मार्ग संकलित केलेल्या सर्व व्यापाऱ्यांच्या संकेतस्थळांवर वापरता येते. हे ईवॉलेट खाते पेमेंट अँड सेटलमेंट सिस्टिम्स अ‍ॅक्ट, 2007 आणि त्या अंतर्गत केलेल्या नियमावली, इशुअन्स अँड ऑपरेशन्स ऑफ प्रीपेड पेमेंट इंस्ड्रुमेंट्स इन इंडिया (रिझर्व्ह बँक) डायरेक्शन्स, 2009 (''आरबीआय मार्गदर्शक सूचना") आणि आरबीआयने वेळोवेळी निर्गमित केलेल्या लागू अधिसूचना/ निर्देश/ सूचना/ मार्गदर्शक सूचना प्रीपेड अधिदान साधने ह्यांनी शासित आहे.

2. वापरकर्त्याने https://www.itzcash.com/user वर त्याचे नाव, मोबाईल क्रमांक आणि ईमेल आयडी नोंदणी पानावर प्रविष्ट करून नोंदणी करणे आवश्यक आहे.

3. यशस्वी नोंदणी झाल्यावर, वापरकर्त्याला शून्य शुल्काचे इट्झकॅश ईवॉलेट खाते (खाते अनुक्रमांक आणि 4 अंकी व्यवहार पिन असलेले) मिळते आणि पडताळणी प्रक्रिया वापरकर्त्याला त्याच्या मोबाईलवर आणि/ किंवा ईमेल पत्त्यावर पाठवली जाते.

4. वापरकर्ता इट्झकॅश वर्ल्ड (आयसीडब्ल्यू) आउटलेटमधून देखील लागू नोंदणी शुल्क भरून नोंदणी करू शकतो.

5. ई वॉलेट युटिलिटी बिल्स आणि अत्यावश्यक सेवांचे अधिदान करण्यासाठी वापरता येऊ शकते. नॉन-युटिलिटी बिल्स किंवा अत्यावश्यक नसलेल्या सेवांच्या बाबतींत, वॉलेटचा वापर वेळोवेळी आरबीआयने विहित केलेल्या केवायसी आवश्यकतांच्या पूर्ततेच्या अधीन राहून करता येऊ शकेल. युटिलिटी बिल्स आणि अत्यावश्यक सेवांसाठीचे अधिदान करण्याकरिता ई वॉलेटचे कमाल मूल्य रु 10,000 आहे, आणि आवश्यक केवायसी कागदपत्रे सुपूर्द केल्यावर त्यावर सक्रिय केलेल्या सर्व अतिरिक्त सेवांच्या बाबतींत रु 1,00,000 आहे.

6. विमोचन, परतफेड, उपयोग या संदर्भात इट्झकॅश ईवॉलेटचा वापर भारतीय रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी घालून दिलेल्या निर्देशानुसार/ सूचनांनुसार/ मार्गदर्शक तत्त्वांनुसार/ नियमांनुसार असेल.

7. इट्झकॅश कार्ड लिमिटेडचे नियम आणि अटी या इट्झकॅश अधिदान पद्धतीने ईवॉलेटच्या वापरासाठी लागू होतात जे वेळोवेळी सुधारले जाऊ शकतात. या ईवॉलेटच्या या वापरात सदर नियम व अटींचा स्वीकार गृहीत धरला जातो.

8. इट्झकॅश ईवॉलेट केवळ 18 वर्षे किंवा त्याहून अधिक वयाच्या या व्यक्तींना मिळवता येते.

9. इट्झकॅश ईवॉलेट हे उत्पादने आणि सेवांची आपल्या संकेतस्थळांवर इट्झकॅश अधिदान पद्धत संकलित केलेल्या व्यापाऱ्यांकडून खरेदी केल्यावर अधिदान करण्यासाठीचे ऑनलाईन व्यवहार करण्यासाठी वापरले जाऊ शकते.

10. इट्झकॅश हे ईवॉलेट वापरून मिळवलेल्या उत्पादनांच्या किंवा सेवांच्या गुणवत्तेसाठी/ संख्येसाठी जबाबदार नसेल इट्झकॅश ईवॉलेट वापरून मिळवलेल्या उत्पादन/सेवांना कोणतेही नुकसान झाल्यास त्याबद्दलही वॉरंटी देत नाही.

11. निर्देशीत व्यापाऱ्यांच्या वेबसाईटवर ईवॉलेट वापरासाठी इट्झकॅश अधिदान मार्ग शुल्क आकारू शकते. ही शुल्क वेळोवेळी लागू असतील तशी अधिदान मार्ग पानावर व्यवहाराच्या वेळी दर्शवली जातील.

12. या ईवॉलेट खात्यावर कोणतेही विमोचन करण्यास किंवा रोख रक्कम काढण्यास मनाई आहे.

13. बंदी असलेल्या उत्पादनांसाठी/सेवांसाठी, अतिरेकी हालचालींना निधीपुरवठा करण्यासाठी, काळा पैसा पांढरा करण्यासाठी, लॉटरी योजनांसाठी सीमापलिकडच्या या आणि/ किंवा परकीय चालनामधील व्यवहारासाठी इट्झकॅश ईवॉलेटचा वापर करण्यास सक्त मनाई आहे.

14. इट्झकॅश हे ईवॉलेटवर अक्रिय खात्याची शुल्क वेळोवेळी निर्दीष्ट केल्यानुसार आकारू शकते.

15. ॲक्टिव्हेशन दिनांकापासून किंवा पहिल्या वापराच्या दिनांकापासून, जे नंतर असेल ते, ई वॉलेट ४ वर्षांसाठी वैध आहे. आरबीआयच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, या ई वॉलेटवर शिल्लक असलेला, न वापरलेला बॅलन्स वैधता दिनांकाच्या समाप्ती नंतर जप्त मानण्यात येईल.

16. वापरकर्त्यांनी बक्षीसे/लॉटरी/ऑफर्स जिंकल्याबद्दल कॉल्स/एसएमएस/ईमेल्सना उत्तरे देऊ नयेत कारण ते फसवे कॉल्स/एसएमएस/ईमेल्स असू शकतात आणि त्यांनी कोणालाही ईवॉलेट खाते क्रमांक आणि पिन देऊ नये कारण त्यामुळे ईवॉलेट खात्यामध्ये असलेल्या रकमेचे नुकसान होऊ शकते.

17. इट्झकॅश ईवॉलेटचा कुठल्याही प्रकारे गैरवापर झाल्यास किंवा नियम व अटींचे उल्लंघन झाल्यास ईवॉलेट खाते बंद/रद्द करण्याची कारवाई ओढावेल.

18. खरेदीसाठी ईवॉलेट एकदा वापरल्यानंतर व्यवहार रद्द केला जाणार नाही.

19. ईवॉलेटच्या वापरासंदर्भातील कोणत्याही व्यवहारातून उध्दभवणारे सर्व वाद मुंबई न्यायालयांच्या अनन्यतः न्यायाधिकार क्षेत्राखाली असतील.

20. हे ईवॉलेट वापरून करण्यात येणारे सर्व व्यवहार लागू भारतीय कायद्यांतर्गत केले जातील.

21. या ईवॉलेट संबंधातील सर्व वाद इट्झकॅश कार्ड लिमिटेडद्वारे त्यांच्या अनन्य अधिकाराखाली सोडवले जातील आणि या बाबतीतील इट्झकॅश कार्ड लिमिटेडचा निर्णय अंतिम राहील.

वरील नियम व अटी इट्झकॅश ईवॉलेट वापरकर्त्याला कोणतीही पूर्वसूचना न देता बदलले, अद्ययावत केले किंवा सुधारले जाऊ शकतात.

कॉल सेंटर माहिती:

° अधिक माहितीसाठी आणि चौकशीसाठी आमच्या या कॉल सेंटर क्रमांकावर संपर्क साधू शकता 022 6112 5757 .

° तुम्ही 57575 या क्रमांकावर Itzhelp <Your Query> असा SMS देखील करू शकता किंवा आम्हाला help@itzcash.com येथे ईमेल करू शकता किंवा ItzCash website ला भेट देऊ शकता आणि हेल्प डेस्कवर क्लिक करून तुमच्या शंका आणि तपशील सुपूर्द करू शकता.